भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/११/२०१६

**१) एसीबी भंडारा यांची कारवाई :–**

दिनांक २८/११/२०१६ रोजी १४.१० वा. यातील आरोपीने आपले पदाचा स्वत:चे आर्थीक लाभाकरीता वाम व भ्रष्ट मार्गाचा गैरवापर करून तक्रारदार भास्कर सेवकराम मश्राम वय ३६ वर्ष धंदा साई पैकींग ई. रा. तुमसर यांनी त्यांचे कंपनी लावण्यासाठी मकानाचे बांधकामाकरीता विर्दभ कोकण ग्रामीण बॅक शाखा तुमसर येथुन घेतलेले २०,०००/रू कर्जाचा बोझा मकानावर नोंद करून नमुना ८, देण्याकरीता मोबदला म्हणुन ५,०००/रू ची मागनी करून तडजोडी नंतर ३,०००/–रू लाच रक्कम स्विकारतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७,१३,(१),(ड) १३,(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपअधीक्षक सावरकर एसीबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) विहीरीच्या पाण्यात बुडुन मृत्यु. :–**

दिंनाक. २७/११/२०१६ रोजी २२.०० वा.दर. यातील मृतक बाळकृष्ण सुखदेव गभने वय ४० वर्ष, रा.मानेगाव बाजार हा गावातील सरकारी विहीरीच्या पाण्यात उडी मारून मरण पावल्याने फिर्यादी धनराज राजाराम शेंद्रे वय ५६ वर्ष रा. नानेगाव बाजार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :–**

दिंनाक. २८/११/२०१६ रोजी ११.०० वा.ते १२.४५ वा.दर. यातील फिर्यादीचा पती मृतक शैलेश किसन बिसने वय २६ वर्ष रा. साखळी याला दारू पिण्याची सवय असल्याने दारू पिवुन फिर्यादी पत्नीला नेहमी मारझोड करीत होता आज सुध्दा मृतक याने पत्नी फिर्यादीला दारू पिवुन मारहान केली फिर्यादीने पो.स्टेला तक्रार देण्यास जाते म्हणुन घरून निघुन गेली असता मृतक हा दारू पिला असल्याने दारूच्या नशेत शंकर पटले रा. साखळी याचे शेतातील मोहाचे झाडाला नॉयलान दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी सौ.शारदा शैलेश बिसने वय २३ वर्ष रा. साखळी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.धार्मीक पो.स्टे.तुमसर हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २८/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८५ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १३ केसेस व ईतर वाहनांवरती ७२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.